# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**मराठी विभाग – राज्यस्तरीय लेखन, काव्य, संगीत कार्यशाळा**

३ सकाळ पुणे, बुधवार, १२ डिसेंबर २०१८

महाराष्ट्र शासन

**सांस्कृतिक कार्य संचालनालय**

ज्येष्ठ साहित्यिक/गायक/संगीतकार पु.ल. देशपांडे,
ग. दि. माडगुळकर आणि सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

## लेखन-काव्य-संगीत कार्यशाळा

ज्येष्ठ साहित्यिक/गायक/संगीतकार पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर आणि सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. १४ डिसें. २०१८ रोजी **के. टी. एस. पी. मंडळ, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर, जि. पुणे** या ठिकाणी लेखन-काव्य-संगीत या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आलेले आहे. यां प्रत्येक कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी, रसिक तसेच सर्व स्तरातील इच्छूक व्यक्तींनी या कार्यशाळेत सहभागी होण्यास आमंत्रित करण्यात येत आहे. प्रत्येक कार्यशाळेसाठी प्रथम अर्ज प्राप्त होणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर प्रवेश देण्यात येईल. कार्यशाळा विनामूल्य नोंदणी अर्ज डॉ. एस.डी. शिंदे (९६०४३ ०९०६०) यांच्याकडे महाविद्यालयात उपलब्ध होतील तसेच संचालनालयाच्या **www.mahasanskruti.org/www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर नवीन संदेश या शिर्षकाखाली दि. १३ डिसेंबर २०१८ रोजी पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

संचालक
सांस्कृतिक कार्य संचालनालय

लोकमत पुणे, बुधवार, दि. १२ डिसेंबर २०१८

महत्त्वाचे

## साहित्यिकांच्या जन्मशताब्दी कार्यशाळांचे आयोजन

राजगुरुनगर : महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक पु. ल. देशपांडे, गीतकार ग. दि. माडगूळकर, संगीतकार सुधीर फडके या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षनिमित्त लेखन, काव्य आणि संगीत विषयांवरील कार्यशाळांचे आयोजन दि. १४ डिसेंबर रोजी महाविद्यालयात करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी दिली. कार्यशाळेत लेखन विषयावर लेखिका संगीता बर्वे (पुणे), डॉ. विनिता तेलंग (सांगली), काव्य विषयावर कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल (पुणे) तर संगीत विषयावर संगीतकार आशिष मुजुमदार व समीर शिवगार (पुणे) मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळ
शुक्रवार, १४ डिसेंबर २०१८ | ५

## लेखन, संगीतावर आज राजगुरुनगरला कार्यशाळा

राजगुरुनगर, ता. १३ : महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक पु. ल. देशपांडे, गीतकार ग. दि. माडगुळकर आणि संगीतकार सुधीर फडके या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लेखन, काव्य आणि संगीत विषयांवरील कार्यशाळांचे आयोजन १४ डिसेंबर रोजी महाविद्यालयात करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी दिली.

या कार्यशाळेत लेखन विषयावर लेखिका संगीता बर्वे (पुणे), डॉ. विनिता तेलंग (सांगली) काव्य विषयावर कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल (पुणे) तर संगीत विषयावर संगीतकार आशिष मुजुमदार व समीर शिवगार (पुणे) मार्गदर्शन करणार आहे. लेखन, काव्य आणि संगीत कार्यशाळेसाठी मर्यादित विद्यार्थीसंख्या असून विद्यार्थ्यांना एकावेळी एकच कार्यशाळेत सहभाग नोंदवता येणार आहे. ही कार्यशाळा विनामूल्य आहे. कार्यशाळा सर्व वयोगटांसाठी व इतर महाविद्यालयातील विद्यार्थी आणि इतरही इच्छुक व्यक्तींसाठी खुली आहे. नोंदणी अर्ज महाविद्यालयाच्या साहेबरावजी बुट्टेपाटील ग्राहक भांडारात तसेच शासनाच्या www.mahasanskruti.org किंवा www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नवीन संदेश या शीर्षकाखाली उपलब्ध आहे. माहितीसाठी डॉ. संजय शिंदे (भ्रमणध्वनी क्र. ९६०४३०९०६०) यांच्याशी संपर्क साधावा.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
श्री. देवेंद्र फडणवीस
मा.मुख्यमंत्री
सांस्कृतिक कार्य संचालनालय
आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, दिक्षाभूमी, नागपूर
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
श्री. विनोद तावडे
मा.मंत्री सांस्कृतिक कार्य
बाबुजी गदिमा पुलं
महात्रयींची
जन्मशताब्दी
२०१८-२०१९
महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त
लेखन | काव्य | संगीत
कार्यशाळा
दि. १९ ऑगस्ट २०१९
सर्व मान्यवर, मार्गदर्शक, प्रशिक्षणार्थी यांचे
सहर्ष स्वागत

लोकमत

डॉ. संगीता बर्वे : महात्रयीच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कार्यशाळा

# विद्यार्थ्यांनी भावना शब्दबद्ध कराव्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** कोणतेही लेखन भावनांशी प्रामाणिक राहून शब्दबद्ध केले, की ते अधिक कसदार होते. विद्यार्थ्यांनी नेमकं कसं लिहायचं, याचा फार विचार न करता उत्स्फूर्तपणे मनातल्या भावना शब्दबद्ध केल्या, तर त्यातून खऱ्या अर्थाने कलाकृतीचा जन्म होईल, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका डॉ. संगीता बर्वे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक पु. ल. देशपांडे, गीतकार ग. दि. माडगूळकर, संगीतकार सुधीर फडके या साहित्यिक महात्रयीच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील होते. या प्रसंगी लेखिका डॉ. संगीता बर्वे, विनिता तेलंग, कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे, संगीतकार आशिष मुजुमदार, समीर शिवगार, प्राचार्य डॉ. एच. बी.पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम.जरे, डॉ. व्ही. डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.




लेखन, काव्य आणि संगीत विषयांवरील कार्यशाळांच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना डॉ. संगीता बर्वे.

**नामांकितांचे मार्गदर्शन**

- लेखन विषयावर कार्यशाळेत लेखिका संगीता बर्वे, डॉ. विनिता तेलंग यांचे मार्गदर्शन
- काव्य विषयावरील कार्यशाळेत कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे यांचे मार्गदर्शन
- संगीत विषयावरील कार्यशाळेत संगीतकार आशिष मुजुमदार यांचे मार्गदर्शन.

अध्यक्षीय मनोगतात बोलताना अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी कलाक्षेत्राशी तरुणाई जोडली जावी म्हणून राज्य सरकारने राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. होतकरु लेखक, कवी, संगीतकारांना उभारी देणारा हा उपक्रम असल्याचे पाटील यांनी पुढे सांगितले. लेखन विषयावर कार्यशाळेत लेखिका संगीता बर्वे, डॉ.विनिता तेलंग यांनी वाचन संस्काराचे लेखनातील महत्त्व, लेखनाच्या प्रेरणा, मांडणी, शैली आणि फॉर्मची निवड, लेखनाचे विषय आणि त्यासाठीची तयारी, कल्पना विस्तार, लेखनाचा व्यावसायिक उपयोग, सृजनशील लेखन, लेखनाचे नियम आणि कौशल्य विकास, नवनवीन माध्यमांची हाताळणी, भाषा आणि सौंदर्यशास्त्राचे नियम, भाषिक प्रयोगशीलता आदि मुद्यांवर मार्गदर्शन केले. काव्य विषयावरील कार्यशाळेत कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे यांनी कवितेचा इतिहास आणि प्रवास, काव्यलेखनाचा विचार, कवितेत रुपकांचा होणारा वापर, कवितेचे प्रकार, काव्य सादरीकरणाचे महत्त्व, मुक्तछंद आणि छंदोबद्ध कविता, वृत्तांची ओळख इ. विषयावर मार्गदर्शन केले.

संगीत विषयावरील कार्यशाळेत संगीतकार आशिष मुजुमदार यांनी कविता आणि गीतामधील फरक स्पष्ट करुन गाण्यांच्या विविध आविष्काराची माहिती देऊन त्या गीतप्रकारांचे सादरीकरण केले. संगीतकाराला चाल कशी सूचते, गाण्याला चाल लावण्याची प्रक्रिया कशी असते, शब्द आणि सूर यांची सांगड घालून गाण्याचा जन्म कसा होतो, चाल सूचण्यामध्ये सर्जनशीलतेचा भाग किती असतो आदि विषयांवर चर्चा केली. त्यांना तबल्यावर समीर शिवगार यांनी साथ दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांनी, सूत्रसंचालन कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. श्वेतांबरी आल्हाट यांनी मानले.

### जिल्ह्यातून ४०० जणांचा सहभाग

लेखन, काव्य आणि संगीत कार्यशाळेसाठी पुणे जिल्ह्यातून सुमारे ४०० प्रशिक्षणार्थींनी यात सहभाग घेतला. प्रातिनिधिक स्वरुपात डॉ. आशा राव (पुणे), डॉ. हणुमंत भवारी (पाबळ) या प्रशिक्षणार्थींना महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात आलेले प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शेवटी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी गदिमा, सुधीर फडके यांची गीते सादर केली.

Hello Pune Gramin
Page No. 4 Dec 18, 2018
Powered by: erelego.com

# विद्यार्थ्यांनी मनातल्या भावना शब्दबद्ध कराव्यात : डॉ. बर्वे

**राजगुरूनगर । वार्ताहर**

कोणतेही लेखन भावनांशी प्रामाणिक राहून शब्दबद्ध केले की ते अधिक कसदार होते. विद्यार्थ्यांनी नेमकं कसं लिहायचे याचा फार विचार न करता उत्स्फूर्तपणे मनातल्या भावना शब्दबद्ध केल्या तर त्यातून खऱ्या अर्थाने कलाकृतीचा जन्म होईल ,असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका डॉ. संगीता बर्वे यांनी केले. महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक पु.ल.देशपांडे, गीतकार ग.दि.माडगुळकर, संगीतकार सुधीर फडके या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित लेखन, काव्य आणि संगीत विषयांवरील कार्यशाळांच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण



प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी लेखिका डॉ.संगीता बर्वे, विनीता तेलंग, कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे, संगीतकार आशिष मुजुमदार, समीर शिवगार, प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी.गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

या प्रसंगी अध्यक्षीय मनोगतात बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी कलाक्षेत्राशी तरूणाई जोडली जावी म्हणून राज्य सरकारने राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक करताना होतकरू लेखक, कवी, संगीतकारांना उभारी देणारा हा उपक्रम असल्याचे सांगितले. एकीकडे वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत असताना दुसरीकडे ई – बुक आणि सोशलमीडिया वर दमदार अभिव्यक्ती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी लेखनातून समाज आणि रसिकता वाढविताना पु.लं.मधील उत्स्फूर्तता, हजरजबाबीपणा, गदिमा व बाबुजींमधील भावाभिव्यक्ती अंगीकारण्याचे आवाहन केले.

लेखन विषयावर कार्यशाळेत लेखिका संगीता बर्वे , डॉ.विनिता तेलंग यांनी वाचन संस्काराचे लेखनातील महत्त्व, लेखनाच्या प्रेरणा, मांडणी, शैली आणि फॉर्मची निवड, लेखनाचे विषय आणि त्यासाठीची तयारी, कल्पना विस्तार, लेखनाचा व्यावसायिक उपयोग, सृजनशील लेखन, लेखनाचे नियम आणि कौशल्य विकास, नवनवीन माध्यमांची हाताळणी, भाषा आणि सौंदर्यशास्त्राचे नियम, भाषिक प्रयोगशीलता आदि मुद्यांवर चर्चा करण्यात आली. काव्य विषयावरील कार्यशाळेत कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे यांनी कवितेचा इतिहास आणि प्रवास, काव्यलेखनाचा विचार, कवितेत रूपकांचा होणारा वापर, कवितेचे प्रकार, काव्य सादरीकरणाचे महत्व, मुक्तछंद आणि छंदोबद्ध कविता, वृत्तांची ओळख इ. विषयावर मार्गदर्शन केले. संगीत विषयावरील कार्यशाळेत संगीतकार आशिष मुजुमदार यांनी कविता आणि गीतामधील फरक स्पष्ट करून गाण्यांच्या विविध आविष्काराची माहिती देऊन त्या गीतप्रकारांचे सादरीकरण केले. संगीतकाराला चाल कशी सूचते, गाण्याला चाल लावण्याची प्रक्रिया कशी असते, शब्द आणि सूर यांची सांगड घालून गाण्याचा जन्म कसा होतो, चाल सूचण्यामध्ये सर्जनशीलतेचा भाग किती असतो आदि विषयांवर चर्चा केली.

सकाळ

बुधवार, १९ डिसेंबर २०१८ | ७

# उत्कट भावनांतून अस्सल कलाकृती

## राजगुरुनगर येथे कार्यशाळेत संगीता बर्वे यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर, ता. १८ : "भावनांशी प्रामाणिक राहून शब्दबद्ध केलेले लेखन अधिक कसदार होते. उत्कट भावनाच अस्सल कलाकृती जन्माला घालतात," असे प्रतिपादन लेखिका डॉ. संगीता बर्वे यांनी केले.

राज्य शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्यातर्फे पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित लेखन, काव्य आणि संगीत विषयांवरील कार्यशाळांच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या कार्यशाळेत सुमारे ४०० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.

लेखनविषयावर कार्यशाळेत संगीता बर्वे आणि डॉ. विनिता तेलंग यांनी लेखनाच्या प्रेरणा, मांडणी, शैली आणि फॉर्मची निवड, कल्पना विस्तार, लेखनाचे नियम आणि कौशल्य विकास, भाषा आणि सौंदर्यशास्त्राचे नियम, भाषिक प्रयोगशीलता याबाबत माहिती दिली.

काव्य विषयावरील कार्यशाळेत कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे यांनी कवितेचा प्रवास, कवितेत रूपकांचा होणारा वापर, कवितेचे प्रकार, मुक्तछंद आणि छंदोबद्ध कविता, वृत्तांची ओळख इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले.

संगीत विषयावरील कार्यशाळेत आशिष मुजुमदार यांनी कविता आणि गीतामधील फरक स्पष्ट करून गाण्यांच्या विविध आविष्कारांची माहिती देऊन त्या गीतप्रकारांचे सादरीकरण केले. त्यांना तबल्यावर समीर शिवगार यांनी साथ दिली.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. श्वेतांबरी आल्हाट यांनी आभार मानले.

केसरी पुणे, १६ डिसेंबर २०१८

# विद्यार्थ्यांनी मनातल्या भावना शब्दबद्ध कराव्यात : डॉ.संगीता बर्वे




राजगुरुनगर, (वार्ताहर) : कोणतेही लेखन भावनांशी प्रामाणिक राहून शब्दबद्ध केले की ते अधिक कसदार होते. विद्यार्थ्यांनी नेमकं कसं लिहायचे याचा फार विचार न करता उत्स्फूर्तपणे मनातल्या भावना शब्दबद्ध केल्या तर त्यातून खऱ्या अर्थाने कलाकृतीचा जन्म होईल, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका डॉ. संगीता बर्वे यांनी केले. महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक पु.ल.देशपांडे, गीतकार ग.दि.माडगुळकर, संगीतकार सुधीर फडके या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित लेखन, काव्य आणि संगीत विषयांवरील कार्यशाळांच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी लेखिका डॉ.संगीता बर्वे, विनीता तेलंग, कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे, संगीतकार आशिष मुजुमदार, समीर शिवगार, प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी.गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी कलाक्षेत्राशी तरुणाई जोडली जावी म्हणून राज्य सरकारने राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक करताना होतकरु लेखक, कवी, संगीतकारांना उभारी देणारा हा उपक्रम असल्याचे सांगितले. एकीकडे वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत असताना दुसरीकडे ई - बुक आणि सोशलमीडिया वर दमदार अभिव्यक्ती व्यक्त होत आहे.

लेखन, काव्य आणि संगीत कार्यशाळेसाठी पुणे जिल्ह्यातून सुमारे ४०० प्रशिक्षणार्थींनी यात सहभाग घेतला. प्रातिनिधिक स्वरूपात डॉ. आशा राव (पुणे), डॉ. हनुमंत भवारी (पाबळ) या प्रशिक्षणार्थींना महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात आलेले प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शेवटी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी गदिमा, सुधीर फडके यांची गीते सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांनी, सूत्रसंचालन कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. श्वेतांबरी आल्हाट यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख